कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी "सामाजिक दायित्व निधी (CSR- Company Social Responsibility) व स्वेच्छा देणगी (Voluntary Donation)" धोरणांतर्गत निधी उभारणी व त्याचा विनियोग करण्याची कार्यपद्धती......

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०२१/प्र.क्र.१४०/कौशल्य-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०२२

**संदर्भ :-**

१. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/शासन निर्णय /क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/ रोस्वरो- १, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.
२. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र क्र. MSSDS/CSR/२०२१/१३२०, दिनांक १३ सप्टेंबर, २०२१
३. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र क्र. MSSDS/CSR/२०२१/१९१९, दिनांक ३० डिसेंबर, २०२१

**प्रस्तावना : -**

महाराष्ट्र हे देशातील औद्योगिकीकरण व व्यवसाय या क्षेत्रातील अग्रगण्य राज्य आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) या क्षेत्रांचा मोठा हातभार आहे. राज्यातील बहुतांश भागात उद्योग व व्यवसायांचे उत्कृष्ट जाळे आहे. कृषी व पशुपालन सारख्या प्राथमिक क्षेत्रापासून (Primary Sector) ते संशोधन, स्टार्ट अप्स सारख्या चतुर्थ क्षेत्रापर्यंत (Quaternary Sector) आवश्यक असणाऱ्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती, उद्योजकता आणि नाविन्यतेची परिसंस्थेचा विकास या विभागामार्फत करण्यात येतो.

२. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ ही कार्यालये विभागाच्या अधिनस्त आहेत. या कार्यालयांच्या पायाभूत सोयी-सुविधांचा विकास, मनुष्यबळाची क्षमतावृद्धी (Capacity Building), विविध रोजगारक्षम प्रशिक्षणांची अंमलबजावणी आणि ज्ञानाधारीत सहकार्य (Knowledge Sharing) यासाठी औद्योगिक व व्यावयायिक आस्थापनांकडून प्रस्ताव प्राप्त होत असतात.

३. केंद्र शासनाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार, कंपनी अधिनियमान्वये नोंदणीकृत असलेल्या सर्व आस्थापनांना त्यांच्या नफ्यातील किमान २ % रक्कम सामाजिक उपक्रमांत गुंतवणेसाठी, सामाजिक दायित्व निधी (Corporate Social Responsibility- CSR) व स्वेच्छा देणगी (Voluntary Donation) बाबत धोरणात्मक आराखडा निश्चित केलेला आहे. या अनुषंगाने विविध उपक्रमांसाठी सामाजिक दायित्व निधी (CSR) व स्वेच्छा देणगी (Voluntary Donation) धोरण स्वीकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता, उद्योजकता, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाशी संलग्न प्रकल्प / उपक्रमांसाठी "सामाजिक दायित्व निधी" (CSR) व "स्वेच्छा देणगी" (Voluntary Donation) निधी स्वीकारणे आणि त्यातंर्गत सदर उपक्रमांची जलद, पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने सोबत जोडलेल्या धोरणात्मक संरचनेचा "मसुदा" व "अंमलबजावणीची कार्यपद्धती" यांस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आहे.

२. सदर "सामाजिक दायित्व निधी (CSR) व स्वेच्छा देणगी (Voluntary Donation)" धोरणामध्ये पार्श्वभूमी, प्रस्तावना, कार्पोरेट संस्थांचे अपेक्षित फायदे, धोरणाची व्याप्ती व उद्देश्य, सहभाग, निधीच्या माध्यमातून अनुज्ञेय बाबी, संरचना, प्रत्यक्ष अंमलबजावणी, लेखापरिक्षण, वित्तीय अधिकार, देखरेख व संनियंत्रण इत्यादींचा समावेश करण्यात आला आहेत.

३. तसेच परिशिष्ट १ मध्ये राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समितीची रचना, कार्ये व जबाबदाऱ्या, परिशिष्ट २ मध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत असलेल्या कक्षांची रचना, अधिकार व जबाबदाऱ्या तसेच परिशिष्ट ३ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्तरावरील कक्षाचे अधिकार व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत.

४. यथास्थित," राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समिती" यांचेकडून वेळोवेळी या कार्यक्रमाच्या फलनिष्पत्तीबाबतचा आढावा घेण्यात येईल. तसेच विभाग प्रमुखाच्या मान्यतेने यासदंर्भातील मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या विधानमंडळविषयक बाबी संबंधित कार्यासनांनी हाताळाव्यात.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०३२८१४४६२७१४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUVARNA S KHARAT

Digitally signed by SUVARNA S KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=35F57024DD03B25B43EA1F6F39E191F897508AEF3C68A8BD9209A39DD656B14C, cn=SUVARNA S KHARAT
Date: 2022.03.28 14:48:32 +05'30'

**(डॉ.सुवर्णा सि. खरात)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई,
१२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई
१४. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई /पुणे /नाशिक / औरंगाबाद/ अमरावती /नागपूर,
१५. उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय मुख्यालय मुंबई / पुणे/ नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर,
१६. सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव / कार्यासन अधिकारी, कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती.

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## सामाजिक दायित्व निधी (Corporate Social Responsibility-CSR) स्वेच्छा देणगी (Voluntary Donation-VD) धोरण

उद्योगांच्या सामाजिक दायित्व निधी (CSR) व स्वेच्छा देणगी (VD) उपक्रम करिता खर्च होणाऱ्या रकमेबाबत केंद्र सरकारने धोरणात्मक आराखडा निश्चित केला असून कंपनी अधिनियम, २०१३ च्या सातव्या अनुसूची व सेक्शन १३५ नुसार खालील प्रकल्प / उपक्रमांसाठी परवानगी देण्यात आली आहे:

१. भूक, गरिबी, आणि कुपोषणाचा नायनाट.
२. शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण यांचा मुले, महिला, वयस्कर आणि अपंग यांमध्ये प्रसार.
३. स्त्रियांच्या हक्कांसाठी, सक्षमीकरणासाठी काम.
४. पर्यावरणाशी निगडीत कामे (जसे की प्राणी, पक्षी, वनस्पती,जीवसृष्टीचे रक्षण आणि संवर्धन).
५. राष्ट्रीय वारसा असेल्या जागा, कला, हस्तकला, संस्कृतीचे रक्षण व संवर्धन.
६. सैन्य दलातील पिडीत सैनिक, मृत सैनिकांच्या विधवा, आणि इतर अवलंबून कुटुंबियांसाठी काम.
७. ग्रामीण खेळ, तसेच Olympic, Para Olympic खेळांसाठीचे प्रशिक्षण.
८. मागास, भटक्या विमुक्त जमाती, अल्पसंख्यांक आणि महिलांच्या विकासासाठी केंद्र सरकार करत असलेल्या निधी संकलनास, किंवा Prime Minister◦s National Relief Fund साठी आर्थिक मदत.
९. शैक्षणिक संस्थांमधील तंत्रज्ञानाधारित प्रयोग शाळांसाठी आर्थिक मदत.
१०. ग्रामीण विकासाची कामे.
११. झोपडपट्टी विकासाची कामे.
१२. लैंगिक समानता, महिला आणि अनाथांसाठी घरे आणि वसतिगृहे उभारणे.
१३. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांची असमानता कमी करण्याच्या उपाययोजना.

उपरोक्त नमूद कलम २,३,९ व १३ अनुषंगाने कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागामध्ये विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याकरीता सामाजिक दायित्व निधी (CSR) व स्वेच्छा देणगी (VD) चा उपयोग करता येणे शक्य आहे.

कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत क्षमता वृद्धिंगत करणे, कौशल्य प्रशिक्षण देणे तसेच उद्योजकता व नाविन्यतेस चालना देणे व त्याद्वारे रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कॉर्पोरेट संस्थांचा सहभाग व त्यासाठी समन्वय साधणे हे महत्वाचे आहे. तसेच याद्वारे विविध कॉर्पोरेट संस्था व उद्योग यांना उत्तम प्रचार प्रसिद्धी (Branding) प्राप्त होणार असून त्यांना शासनासोबत सहजतेने काम करता येणे शक्य आहे.

### १. सामाजिक दायित्व निधी (CSR) व स्वेच्छा देणगी (VD) धोरणाच्या अनुषंगाने कॉर्पोरेट संस्थांचे अपेक्षित फायदे

१. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगीच्या माध्यमातून प्रशिक्षण सुरु असणाऱ्या प्रशिक्षण संस्थांच्या प्रशिक्षण केंद्रांवर कॉर्पोरेट ब्रँडिंगद्वारे प्रचार प्रसिद्धी.
२. कर सवलत (Tax Exemption).
३. ऑनलाईन पोर्टलद्वारे पारदर्शक देखरेख यंत्रणा.
४. सरकारी यंत्रणेमार्फत कार्यक्रम अंमलबजावणीवर संनियंत्रण.
५. प्रकल्प सुरु असताना नियमित - मासिक आणि त्रैमासिक प्रगती अहवाल.

६. निवडक प्रकल्पासाठी, प्रकल्प समाप्तीनंतर परिणाम मूल्यांकन अहवाल (Impact Assessment).
७. कॉर्पोरेट संस्थांमधील क्षेत्रीय तज्ञ व्यक्ती (Domain Exeperts) द्वारे ज्ञान, कौशल्य सामायिकरण (Knowledge Sharing) ची संधी.

**२. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी धोरणाची व्याप्ती व उद्देश :-**

१. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी अंतर्गत निधी प्राप्त करणे आणि तद्नंतर त्याचा विनियोग करणे याबाबत धोरणात्मक तथा कायदेशीर चौकट तयार करण्याची आवश्यकता आहे.
२. राज्यात सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधीच्या माध्यमातून कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता, उद्योजकता, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संदर्भातील विविध उपक्रमांची अंमलबजावणी, समन्वय आणि देखरेख करणे.
३. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय (CSDEE), महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ व महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) या कार्यालयांची आवश्यकता आणि कॉर्पोरेट संस्थांची इच्छुकता यानुसार सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधी जमवाजमव आणि विनियोग याकरिता आवश्यक तो समन्वय राखणे.
४. औद्योगिक आस्थापना यांचे मार्गदर्शन व सहकार्य याद्वारे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तांत्रिक विद्यालय/ महाविद्यालय, कौशल्य विकास संस्था व इतर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्यामधील प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधांचा दर्जा वाढ करणे.
५. राज्यातील दुर्गम भागात स्थित प्रशिक्षण संस्थांना औद्योगिक आस्थापनांचे सहकार्य लाभण्यासाठी राज्यस्तरावर समन्वय करणे.
६. औद्योगिक आस्थापनांमध्ये आवश्यक कौशल्य व प्रशिक्षण संस्थांमध्ये देण्यात येणारे प्रशिक्षण, यांच्यामध्ये सुयोग्य सांगड घालून प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
७. औद्योगिक आस्थापना यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यामार्फत विविध प्रकल्प/उपक्रम हाती घेणे व ते यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी त्यांच्याशी समन्वय साधणे.
८. विभागाच्या दृष्टीने आवश्यक असे अभ्यास दौरे, कार्यशाळा, परिषदा, एक्सेंज कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**३. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगीचे स्वरूप :-**

सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी अंतर्गत व्यावसायिक (कॉर्पोरेट) संस्था व उद्योग संस्था खालील माध्यमातून सहभागी होवू शकतात.

**अ) निधी :**

प्रस्तावित पॉलिसी अंतर्गत कॉर्पोरेट संस्था विभागास सामाजिक दायित्व निधी अथवा स्वेच्छा देणगी स्वरुपात निधी देवून सहभागी होवू शकतात.

**ब) वस्तू आणि सेवा :**

ज्या कॉर्पोरेट संस्था निधी देण्यास इच्छुक नसतील अशा संस्था वस्तू आणि सेवा स्वरुपात सहभागी होवू शकतात.

वरीलप्रमाणे निधी (निधी / देणगी), वस्तू अथवा सेवा स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी सहभागातून राबवावयाच्या विविध कौशल्य विकास कार्यक्रमांसाठी खालीलप्रमाणे मॉडेल (प्रतिमान) प्रस्तावित करण्यात येत आहे.

**४. विविध संस्थांमार्फत सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधी संकलन व शासन सहभाग :-**

१. एका आर्थिक वर्षात किमान रु. २ कोटी इतका सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधी, कौशल्य विकास कार्यक्रमांकरिता खर्च करणाऱ्या संस्था यामध्ये सहभागी होवू शकतात तसेच हे धोरण वस्तू आणि सेवा स्वरूपातील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी सहभागासाठीही लागू असेल.

२. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी च्या माध्यमातून एखादी संस्था/प्रशिक्षण संस्था/अशासकीय संस्था (NGO) इ. जर कौशल्य विकास कार्यक्रत राबवित असेल व जर तिने सदर कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यास राज्य शासनाच्या सहभागाची अपेक्षा व्यक्त केली तर या करिता शासनाचा सहभाग असेल तथापि, या प्रकल्प अंमलबजावणीसाठी "राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समिती" ची पूर्वमान्यता बंधनकारक आहे. सहभागी होणाऱ्या संस्थेची "प्रकल्पनिहाय अंमलबजावणीमधील भूमिका आणि शासन सहभाग" याबाबत सदर समिती आवश्यकतेनुसार निर्णय घेईल.

| अ. क्र. | संस्था स्तरावरून एका वित्तीय वर्षात खर्च केलेला निधी | संस्थेने खर्च केलेल्या निधीच्या प्रमाणात शासन सहभाग (%) |
|---|---|---|
| १ | रु. २ ते ५ कोटी ( रु. २,००,००,००० ते ५,००,००,०००) | २०% |
| २ | रु. ५ ते १० कोटी ( रु. ५,००,००,००१ ते १०,००,००,०००) | ४०% |
| ३ | रु. १० कोटींपेक्षा अधिक ( रु. १०,००,००,००१ आणि त्यावरील) | ६०% |

३. कंपनी / कॉर्पोरेट यांनी सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी साठीचा निधी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या नोडल एजन्सीला वर्ग करावा. (Fund transfer Directly to Nodal Agency) तद्नंतर सदर निधीचा विनियोग मार्गदर्शक सूचनांनुसार अ. क्र. ५ मधील अनुज्ञेय बाबींसाठी करण्यात येईल.

४. कॉर्पोरेट संस्था जर सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधी विभागाच्या नोडल एजन्सीला निधी वर्ग करण्यास इच्छुक नसतील तर अशा संस्था विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांसाठी येणारा खर्च त्यांच्या स्तरावरून थेट संबंधित संस्थेस अदा करु शकतात.

५. कंपनी / कॉर्पोरेट संस्था त्यांच्या इच्छुकतेनुसार या विभागासाठी "Knowledge Partner" म्हणूनही संलग्न होवू शकतात. कॉर्पोरेट / कंपनी यांच्यामार्फत या विभागाशी संबंधित इतर प्रतिमानाबाबत (Model)प्रस्ताव आल्यास त्यानुसार संबंधित कॉर्पोरेट / कंपनी यांची अपेक्षा आणि विभागाची गरज याची सांगड घालून त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. वरील मॉडेलच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी संदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना आवश्यकतेनुसार निर्गमित करण्यात येतील.

**५. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगीच्या माध्यमातून अनुज्ञेय बाबी:-**

१. कौशल्य विकास, रोजगार यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे अथवा विकसित करून देणे / मदत करणे. तसेच विभागीय स्तरावरील कौशल्य विकास कार्यालयांमधील पायाभूत सुविधा विकसित करणे.

२. कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करणे.

३. विभागातील मनुष्यबळाची क्षमता बांधणी (capacity building) करणे.

४. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,सेंटर ऑफ एक्सलन्स यांची उभारणी.


५. Startups, Incubators, Researchers (Startup Parks, Exhibitions, Mini Incubators) यांना प्रोत्साहन देणे.
६. प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण (ToT) आयोजित करणे.
७. आधुनिक तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण देणे.
८. भविष्यात मागणी असणाऱ्या कौशल्यावर आधारित अत्याधुनिक प्रयोगशाळांची (Skill Labs) निर्मिती करणे.
९. अपंग, विधवा, वीरपत्नी इ. वंचित व शोषित (Disadvantaged group) प्रवर्गातील उमेदवारांसाठी अध्ययन पद्धती आणि साधने विकसित करणे.
१०. औद्योगिक प्रशिक्षण संस्था अद्ययावत करणे.
११. प्रशिक्षणार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी औदयोगिक आस्थापनांच्या गरजांवर आधारित मॉड्यूलर प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करुन प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
१२. प्रभावी प्रशिक्षण आणि प्रशिक्षणातील प्रासंगिकतेत सुधारणा या आधारे अभ्यासक्रम अद्ययावत करणे.
१३. प्रशिक्षण साहित्य (Instructional/ Teaching Materials) जसे की दृक्श्राव्य (Audio Video), Simulation प्रशिक्षण साहित्य, संस्थेचे तपशीलवार जॉब असाइनमेंट, इत्यादी विकसित करणे.
१४. निदेशक/ प्रशिक्षक आणि औद्योगिक आस्थापना कर्मचारी यांच्या देवाण-घेवाणीच्या आधारीत (Faculty- Worker Interaction) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.
१५. व्यावसायिक विषयांचे व्याख्याते व औद्योगिक क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन सत्र/ कार्यशाळा/ समुपदेशन आयोजित करणे.
१६. औद्योगिक आस्थापनांमध्ये प्रशिक्षणार्थ्यांसाठी On Job Training (OJT) आयोजित करणे.
१७. संस्था परिसराचा (Campus) विकास करणे.
१८. कार्यशाळांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामुग्री, उपकरणे व हत्यारे उपलब्ध करुन देणे, यंत्रसामुग्री व उपकरणांची दुरूस्ती व देखभाल करणे.
१९. औद्योगिक आस्थापनांना भेटी (Industrial Visits) आयोजित करणे.
२०. प्रशिक्षणार्थ्यांना शिष्यवृत्ती (Scholarship) देणे.
२१. Model Career Centre (MCC) व Career Guidance & Counselling Centre (CGCC) तयार करणे आणि तद्नंतर व्यवस्थापनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे.
२२. राज्यस्तरीय रोजगार मेळावे आयोजित करण्यासाठी आवश्यक ते सहाय्य (Physical & financial support) करणे.
२३. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र शिबीर आयोजित करणे. त्याकरिता Online lecture, Digital Content इ. विकसित करण्याकरिता सहाय्य करणे. नवीन प्रशिक्षण तंत्रज्ञानाचा अवलंब करणे
२४. प्रशिक्षणार्थी /प्रशिक्षक यांच्यासाठी डिजिटल लायब्ररी आणि e -Learning प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणे.
२५. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागास आवश्यक वाटतील असे कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाशी निगडीत उपक्रम.
२६. Knowledge Partnership साठी प्रोत्साहन देणे.
२७. वित्तीय व इतर कामकाजासंदर्भात प्रक्रियांचे आधुनिकीकरण (Process Automation) करणे.

२८. कौशल्य विकास, व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन, व्यक्तिमत्व विकास इ. विषयक शिबिरांचे आयोजन करणे.
२९. परदेशी जावू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे.
३०. मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे (Consultant).
३१. उमेदवारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देणे.
३२. सर्वसमावेशक पोर्टल, IT Platform विकसित करणे.
३३. विभागाच्या दृष्टीने आवश्यक असे विविध अभ्यास दौरे (इतर राज्ये व परदेशातील) कार्यशाळा, परिषदा, एक्सेंज  कार्यक्रमांचे आयोजन करणे.
३४. कौशल्य स्पर्धा (Skill Competition), तंत्रप्रदर्शन (Technical Exhibition) आयोजित करणे.
३५. तज्ञ व्यक्ती/संस्थेमार्फत कौशल्य अंतर अभ्यास Skill Gap Assessment इ.करिता मुल्यांकन करणे.

यथास्थिती, यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार "राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समिती"ला राहतील.

**६. संरचना :-**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी धोरणाची अंमलबजावणी खालील कार्यालयांमार्फत करण्यात येईल.




**७. धोरण अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी समिती / कक्षांची रचना, कार्य व जबाबदाऱ्या :-**

| अ.क्र | स्तर | समिती / कक्ष | समिती /कक्षाची रचना, कार्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|
| १ | राज्यस्तर | राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समिती | मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग हे या समितीचे अध्यक्ष असतील. सदर समितीची रचना, कार्य व जबाबदाऱ्या "परिशिष्ट १" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. |
| २ | विभागस्तर | अ) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय<br>ब) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय<br>क) महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ<br>ड) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी | १. प्रत्येक कार्यालयांमधील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष हा कार्यालय प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात यावा.<br>२. सदर कक्षांची रचना, कार्य व जबाबदाऱ्या "परिशिष्ट २" मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.<br>३. कक्षामध्ये संबंधीत विभागातील विधी तज्ञ तसेच लेखा अधिकारी यांचा समावेश असावा.<br>४. कक्षामध्ये कार्यक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक तज्ञांचा समावेश करण्याचे अधिकार कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | इ) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी<br>यांमधील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष | प्रमुखांना राहतील.<br>५. कक्षाची बैठक ३ महिन्यातून एकदा घेण्यात यावी. |

राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष स्थापित करण्यात येईल. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील Institute Management Committee (IMC) कडे या कक्षाची जबाबदारी राहील. सदर समितीची रचना, कार्य व जबाबदाऱ्या "परिशिष्ट ३" मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

**८. लेखा परिक्षण :-**

सामाजिक दायित्व व स्वेच्छा देणगी निधी चा उपयोग करून येणाऱ्या कार्यक्रमांचे/ प्रकल्पाचे/ उपक्रमांचे वार्षिक लेखापरिक्षण सनदी लेखापाल यांच्याकडून प्रतिवर्षी करून घेणे बंधनकारक राहील. सदर लेखा परिक्षणाचा अहवाल राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समितीस सादर करणे अनिवार्य राहील.

**९. वित्तीय अधिकार, देखरेख व संनियंत्रण:-**

औद्योगिक प्रशिक्षण संस्था व विभागांतर्गत असलेल्या कार्यालयांमधील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष, राज्य समिती यांना प्राप्त निधीतून कार्यक्रम/उपक्रम राबविण्याकरिता वित्तीय अधिकार/मर्यादा पुढीलप्रमाणे असतील.

| **अ. क्र.** | **सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संदर्भात वित्तीय अधिकार** | **सक्षम प्राधिकरण** |
|---|---|---|
| १. | रुपये २५ लाख पर्यंत | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये स्थापित होणारा सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष [औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील Institute Management Committee (IMC)] |
| २. | रुपये २५ लाख ते रुपये १ कोटी पर्यंत | कौशल्य विकास विभागांतर्गत येणाऱ्या खालील कार्यालयांमध्ये कार्यालय प्रमुखांच्या अध्यक्षतेखालील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष<br>१) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी<br>२) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी<br>३) कौशल्य विकास, रोजगार वउद्योजकता आयुक्तालय<br>४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय<br>५) महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ |
| ३. | रुपये १ कोटीच्या पुढे | राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समिती. |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संदर्भात प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने विविध अनुज्ञेय बाबींवर खर्च करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकरणास राहतील. रुपये १ कोटी पेक्षा अधिकच्या सामाजिक दायित्व व स्वेच्छा देणगीच्या कामांकरीता राज्यस्तरीय समितीची मान्यता घेणे अनिवार्य राहील. तसेच राज्यस्तरीय बैठकींमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था व विभागातील विविध कार्यालयांनी केलेल्या कामांचा अहवाल सादर करणे बंधनकारक असेल. तसेच ज्या प्रकल्पांचा एकूण खर्च रु.१ कोटी पेक्षा अधिक असेल असे प्रकल्प / कार्यक्रम / उपक्रम पूर्ण झाल्यानंतर Impact Assessment बाबतची कार्यवाही अंतर्गत अथवा बाह्य मुल्यमापनाद्वारे करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांच्याकडून याबाबतचे देखरेख व सनियंत्रण करण्यासाठी आवश्यकतेनुसार पोर्टलवर स्वतंत्र व्यवस्था (digitalised formats) विकसित करण्यात येईल.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्यात सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी धोरणाची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करण्याकरिता "महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी" (MSInS) या संस्थेस "नोडल एजन्सी" म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

मा. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई हे या धोरणाचे "अंमलबजावणी व संनियंत्रण अधिकारी" असतील.

१०. **नोडल एजन्सीची (महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी -MSInS) कार्ये :-**

१. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी प्रकल्प / उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता नोडल एजन्सी म्हणून आवश्यक ती कार्यवाही करणे.

२. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व उद्योग / कॉर्पोरेट यांच्या मागणीनुसार त्यांचे लक्ष्यीत क्षेत्र (Focus area) विचारात घेवून संबंधित विभाग / क्षेत्रीय कार्यालयाकडून customised प्रस्ताव तयार करून घेणे व त्याकरिता आवश्यक तो समन्वय साधणे.

३. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संबंधित सर्व प्रकल्प / उपक्रमांबाबतचे Management Information Systems (MIS) शासनास नियमित सादर करणे.

४. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी प्रकल्प / उपक्रमांबाबत "निधी" करिता विविध उद्योग / कॉर्पोरेट आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्याशी संवाद साधून आवश्यक ती कार्यवाही करणे.

५. उद्योग / कॉर्पोरेट यांच्याशी समन्व्यय साधणे.

६. कौशल्य विकासासाठी कॉर्पोरेट संस्थांकडून सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संकलित करणे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापिठाकरिता सामाजिक दायित्व/स्वेच्छा देणगी संदर्भातील मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**परिशिष्ट-१**

**राज्यस्तरीय कौशल्य विकास सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी समिती व रचना :-**

<table>
<tr><th>अध्यक्ष/ सहध्यक्ष/ सदस्य</th><th>नाव</th><th>राज्यस्तरीय कौशल्य विकास विभाग समितीची मुख्य कार्ये व जबाबदाऱ्या</th></tr>
<tr><td>अध्यक्ष</td><td>मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग</td><td rowspan="11">१. कॉर्पोरेट सामाजिक दायित्व स्वेच्छा देणगीच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या निधीमधून रू.१ कोटी पेक्षा अधिक उपक्रम / प्रकल्प/कार्यक्रमांना मान्यता देणे.<br>२. उपक्रम तथा प्रकल्प सुरु असताना वेळोवेळी प्रगतीपर आढावा घेणे.<br>३. उपक्रम तथा प्रकल्पाच्या Impact Assessment बाबत आढावा घेणे.<br>४. कौशल्य विकासासाठी सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संदर्भातील SOP व प्रक्रियेत मंजूरी देणे.<br>५. शासनासमवेत राबविण्यात येत असलेल्या सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी उपक्रमांबाबत कॉर्पोरेट संस्थांना भेडसावणाऱ्या स्थानिक समस्यांचे निराकरण करणे. त्याकरिता आवश्यक समन्वय साधणे.<br>६.राज्यातील तसेच इतर राज्यातील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी मधून कौशल्य विकासासंदर्भातील Best Practices बाबत संशोधन करून राज्यात त्याची अंमलबजावणी करणे. Best Practices संकलित, प्रसिध्द व वितरीत करणे.<br>७. जागतिक दर्जाच्या आणि निवडक बहुद्देशीय (Multi national) कंपनीसोबत सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी च्या माध्यमातून शासन आणि उद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याकरिता समन्वय साधणे,<br>८. राज्यस्तरीय बैठकींमध्ये विभागप्रमुख व औद्योगिक प्रशिक्षण संस्था विभागातील विविध कार्यालयांनी केलेल्या सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कामांचा अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.</td></tr>
<tr><td>सह अध्यक्ष</td><td>मा. प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>आयुक्त , कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग/ मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, /महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी.</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अभियान समन्वयक, MSSDS</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>उपआयुक्त, कौ. वि. रो. व उ. विभागीय आयुक्तालय</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>कॉर्पोरेट संस्थेचे प्रतिनिधी</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी</td></tr>
<tr><td>सदस्य</td><td>सहसचिव , कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग</td></tr>
<tr><td>सदस्य सचिव</td><td>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी</td></tr>
</table>

## परिशिष्ट-२

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत असलेल्या कार्यालयांतील कक्षांचे अधिकार व जबाबदाऱ्या:-

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत असलेल्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय (CSDEE), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET), महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS), महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MAHARASHTRA STATE INNOVATION SOCIETY) या कार्यालयांच्या स्तरावरील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्षाची स्थापना कार्यालयप्रमुखांच्या अध्यक्षतेखाली करण्यात यावी. यामध्ये लेखा अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कार्यालयांमधील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष</th><th>अधिकार व जबाबदाऱ्या</th></tr>
<tr><td>१</td><td>कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय</td><td rowspan="5">१. राज्यात सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी अंतर्गत कौशल्य विकासासाठी कार्य करण्याची इच्छा असणाऱ्या सर्व कॉर्पोरेट संस्थांसाठी प्रथम स्तरावरील संपर्क सेल म्हणून काम करणे.<br>२. कौशल्य विकासासाठी सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संदर्भातील SOP व प्रक्रिया यांचे प्रारूप (Draft) तयार करणे.<br>३. औद्योगिक आस्थापना / औद्योगिक संघटना (असोसिऐशन)/ विविध कॉर्पोरेट संस्थांशी सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधी / प्रकल्पासाठी आवश्यक सहकार्यासाठी प्राथमिक संवाद साधणे<br>४. कौशल्य विकासासाठी कॉर्पोरेट संस्थांकडून सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी प्राप्त करून घेणेसंदर्भात प्राथमिक संवाद साधणे<br>५. उद्योग / कॉर्पोरेट यांच्या मागणीनुसार प्रस्ताव customised करणे व त्यांच्याशी समन्व्यय साधणे.<br>६. शासनासमवेत राबविण्यात येत असलेल्या सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी उपक्रमांबाबत कॉर्पोरेट संस्थांना भेडसावणाऱ्या शासनस्तरीय समस्यांचे निराकरण करणे. त्याकरिता शासन अथवा इतर विभागांशी समन्वय साधणे.<br>७. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी उपक्रम अंतर्गत कौशल्य विकास कार्यक्रमाचे व्यवस्थापन, नियोजन व अंमलबजावणी करणे.<br>८. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधीमधून होणाऱ्या प्रशिक्षणाचे MIS तयार करणे. कौशल्य विकास संदर्भात पायाभूत सुविधा व अन्य समर्थनांच्या आवश्यकतेबाबत माहिती प्रकाशित करणे.<br>९. उपक्रम तथा कार्यक्रमाअंती त्रयस्थ संस्थेमार्फत करावयाच्या मूल्यमापन / Impact Assessment करिता आवश्यक त्या माहितीसाठी समन्वय साधणे.<br>१०.उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या औद्योगिक आस्थापनांना संस्था व्यवस्थापन समितींमध्ये (Institute Management Committee) अध्यक्ष अथवा सदस्य नेमण्यासाठी शिफारस प्रस्तावित करण्याची कार्यवाही करणे.<br>११. सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी संदर्भीय सर्व माहिती पोर्टलवर वेळोवेळी प्रकाशित करणे.<br>१२. राज्यस्तरीय समितीच्या बैठकीमध्ये वेळोवेळी केलेल्या कामाचे नियोजन व प्रगतीबाबतची माहिती सादर करणे.</td></tr>
<tr><td>२</td><td>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय</td></tr>
<tr><td>३</td><td>महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ</td></tr>
<tr><td>४</td><td>महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी</td></tr>
<tr><td>५</td><td>महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी</td></tr>
</table>

प्रकल्प/कार्यक्रम/ उपक्रमाच्या अनुषंगाने तज्ञांना आमंत्रित करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना राहतील.

## परिशिष्ट-३

### औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्तरावरील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील संस्था व्यवस्थापन समिती (Institute Management Committee) या कक्षाचे काम पाहिल. (जर इतर कॉर्पोरेट / कंपनीने सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी निधीच्या माध्यमातून प्रकल्प / उपक्रमाकरिता इच्छुकता दर्शविल्यास त्याकरिता आवश्यकतेनुसार Joint Working Committee (JWC) स्थापन करण्याचे अधिकार देखील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना राहतील). सदर समितीची रचना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या निर्गमित सूचनांनुसार राहील.

| अ.क्र. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी कक्ष | अधिकार व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| १ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील संस्था व्यवस्थापन समिती (Institute Management Committee) | १. सामंजस्य करारानुसार निर्धारित उपक्रम/ प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधान्यक्रम ठरवून नियोजन करणे.<br>२. उपक्रम/ प्रकल्पासाठी विविध स्तरावरील आवश्यक मान्यता घेणे.<br>३. उपक्रम/ प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा प्राधान्याने विकास करणे व आवश्यक तेथे विविध उपलब्ध योजनेंतर्गत Matching Fund उपलब्ध करुन घेणे/ मान्यता घेणे.<br>४. उपक्रम/ प्रकल्प सुरु असताना वेळोवेळी प्रगतीपर आढावा घेणे.<br>५. उपक्रम/ प्रकल्प राबवितांना येणाऱ्या अडचनींचे निकारण करण्यासाठी शासन, इतर विभागांशी व संचालनालयाशी समन्वय साधणे.<br>६. उपक्रम/ प्रकल्पाच्या Impact Assessment बाबत आढावा घेणे.<br>७. वार्षिक संमेलन/ कार्यशाळांचे आयोजन करणे.<br>८. राज्यातील Best Practices चा अभ्यास करुन त्याप्रमाणे अवलंब करणे.<br>९. औद्योगिक आस्थापनांच्या प्रतिनिधींना संस्थेत आयोजित कार्यक्रमास निमंत्रित करणे.<br>१०. औद्योगिक प्रशिक्षण संस्थास्तरीय समितीचा अहवाल संबंधीत प्रादेशिक कार्यालय व संचालनालयास वेळोवेळी सादर करणे. |

********************